*NAVJYOT / Vol. IX / Issue – II* *ISSN 2277-8063*

# शेतकरी विकासातील मा. शरद पवार यांचे योगदान

**श्री. सोमनाथ भानुदास जाधव**
संशोधक विधार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रस्तावना**

भारताच्या आर्थिक व ग्रामीण विकासात कृषी क्षेत्राचे योगदान अत्यंत महत्वाचे आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला महत्वाचे स्थानअसून भारताच्या वाढणाऱ्या लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा करणारे साधन म्हणून कृषिक्षेत्रला महत्त्व आहे. विविध उद्योगाना लागणारा कच्चा मालाचा पुरवठाही कृषी क्षेत्रातूनच केला जातो. कृषी क्षेत्राच्या व शेतकऱ्यांच्या विकासासाठी मा. शरद पवार यांनी मोलाचे योगदान दिले. महाराष्ट्र आणि भारत सरकारमध्ये काम करताना पवार साहेबांनी शेती आणि शेतकऱ्यांना अनुकूल निर्णय घेतले. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राच्या आणि देशाच्या राजकारणावर ज्या व्यक्तींनी प्रभाव पडला त्यात मा. शरदराव पवार हे प्रमुख व्यक्तीमत्व आहेत. त्यांच्या कर्तबगार व्यक्तिमत्वाचा ठसा महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक जीवनावरती उमटला आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या वातावरणात हरवलेला माणूस शेतीतून शोधून काढण्याचे कसब त्यांनी दाखविले. ते केवळ कृषिमंत्री राहिले नाहीततर शेतीनिष्ठ जगण्याचे उपासक बनले आहेत. शेती हा जगण्याचा पाया मानून त्यांनी उभारलेले विविध विविध प्रकल्प व संस्था हे ह्याची साक्ष देतात. सदर शोधनिबंधात शेतकरी विकासातील माननीय शरद पवार साहेब यांचे योगदान अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे.

महाराष्ट्राचा आणि पर्यायाने देशाचा सर्वांगीण विकास जर साधायचा असेल तर सर्वप्रथम ग्रामीण भागाचा विकास व्हायला हवा.हीभूमिका शरदराव पवार यांनी सुरुवातीपासूनच पक्की केली. त्याकरिता त्यांनी ग्रामीण भागाच्या कृषी औद्योगिक विकासाला प्राधान्य दिले. त्यांनी जे पायाभूत व रचनात्मक कार्य केलेले आहे ते पुढीलप्रमाणे.

**१ बारामती कृषी उद्योग प्रतिष्ठान**

दुष्काळग्रस्त असलेल्या बारामती परिसरातील शेती व शेतकऱ्यांना दारिद्रय व मागासलेपणाच्या दुष्टचक्रातून बाहेर काढण्याकरिता मा. शरद पवार यांनी आपल्या सहकार्यांच्या मदतीने बारामती कृषी उद्योग प्रतिष्ठानची स्थापना केली. या कामांमध्ये त्यांचे थोरले बंधू व प्रसिद्ध कृषीतज्ञ आप्पासाहेब पवार यांचे मोलाचे सहकार्य लाभले.या प्रतिष्ठानमार्फत जलसंधारण, फलोत्पादन, दुग्ध व्यवसाय, आधुनिक व वैज्ञानिक पद्धतीची शेती अशा विविध पातळ्यांवर अनेक नवनवीन प्रयोग राबविले गेले. जमीन, पाणी आणि खते इत्यादी शेती संलग्न गोष्टींचा शास्त्रशुद्ध अभ्यास करून शेतकऱ्यांना शिक्षण व प्रशिक्षण दिले गेले.जागतिक आधुनिक शेती तंत्रज्ञान आत्मसात करण्याकरिता इस्राईल, ऑस्ट्रेलिया व अमेरिका येथील शेतीला भेटी दिल्या गेल्या त्यातून ठिबक आणि तुषार सिंचन यासारख्या आधुनिक जलसिंचनपद्धतीचा स्वीकार केला गेला. या प्रतिष्ठाने माळराणावर फळबाग लागवडीचा प्रयोग केला तर दुसरीकडे या फळांवर प्रक्रिया करणारे उद्योग देखील उभे केले.

**२. जलसंधारणाद्वारे दुष्काळावर मात**

आज सर्वत्र शेततळी आणि जलयुक्त शिवार योजनेचा जो बोलबाला पाहायला मिळतो याचपद्धतीची कामे सन 1960 च्या दशकात शरदरावांनी बारामती परिसरात केली व दुष्काळप्रणव असलेल्या बारामती भागाचा कायापालट घडवून आणला. लोकसहभाग, शासनाकडे सातत्याने पुरवठा आणि स्वत: कार्यकर्त्यांसोबत राहून त्यांनी 1962 च्या दुष्काळामध्ये बारामतीमध्ये जी पाझर तलावाची कामे केली ती पाहिली तर त्यांची दूरदृष्टी व समस्येच्या मुळाशी जाऊन त्यांची तड लावण्याची जिद्द दिसून येते.

**३. डावी आघाडीची दिंडी :**

शेतमालाला किफायतशीर भाव मिळावा आणि शेतमजुरांना आठवड्याची सुट्टी मिळावी या मागणीसाठी शेतकरी आणि शेतमजूरांची दिंडी श्री. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली

आयोजित करण्यात आलेली होती. राज्यातील सहा विरोधी पक्षाच्या डाव्या आघाडीने ही दिंडी आयोजित केली होती. पोहरा बंडीच्या जंगलात पायी दिंडी चालली असताना शरदराव पवार, एन. डी. पाटील, यशवंतराव चव्हाण इत्यादी नेत्यांना अटक झाली होती. या दिंडीचा शेतकऱ्यांना पुढे लाभ मिळाला.

**४. कापूस एकाधिकार योजनेचे शिल्पकार :**

मराठवाडा आणि विदर्भामध्ये कापूस हे मुख्य पीक आहे. महाराष्ट्राच्या तुलनेने बाहेरील राज्यात कापसाचे जास्त दर असताना महाराष्ट्रात मात्र कमी दर मिळत असे. यावर उपाय म्हणून राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी कापूस एकाधिकार योजना 1970च्या दशकात सुरु केली. यायोजनेचा लाभ महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना होऊन त्यांच्या आर्थिक परस्थितीत सुधारणा झाली. याचे श्रेय मा. शरद पवार यांना जाते.

**५. कृषीमंत्री असताना केलेले कार्य :**

सन २००४ मध्ये देशाच्या कृषिमंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून ते सन २०१४ पर्यंत मा. शरद पवार यांनी कृषी क्षेत्रात अतिशय क्रांतिकारक अशी पावले टाकली. परदेशातून धान्य आयात करून तेथील शेतकऱ्यांना पैसे देण्यापेक्षा आपल्या देशातील शेतकऱ्यांना हमी भाव वाढवून दिला तर ते मोठे उत्पादन करतील आणि त्याच्या आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा होईल असा विचार करून केंद्रीय कृषीमंत्री या नात्याने मा. शरद पवार यांनी गहू, ज्वारी, बाजरी,तांदूळ, साखर, कापूस, डाळी, तेलबिया यासारख्या ४२ वस्तूचे भाव वाढवून दिले. परिणामी एकेकाळी धान्य आयात करणारा देश आज अनेक देशांना धान्य निर्यात करू लागला आहे. सन २००५-०६ साली त्यांनी राष्ट्रीय फळबाग अभियानास प्रारंभ केला. त्याद्वारे देशातील १ ८राज्ये व ३ केंद्रशासित प्रदेशातील फळे व भाज्या उत्पादक शेतकऱ्यांना १०० टक्के अर्थसाह्य देऊन प्रोत्साहीत केले. तसेच ईशान्य व हिमालयीन प्रदेशातील राज्यांसाठी आणखी एक स्वतंत्र फळबाग अभियान सुरु केले त्यामुळे २०१३ पर्यंत ६० लाख हेक्टर जमीन फळाच्या लागवडीखाली व ८० लाख हेक्टर जमीन नव्याने भाजीपाल्याच्या लागवडीखाली आली. म. शरद पवार यांच्या प्रयत्नामुळे आज भारत फळे व भाजीपाला उत्पादनात जगात दुसऱ्या क्रमांकावर पोहचला आहे. भारताला जागतिक स्तरावर अन्नधान्य निर्यातदार देश बनवण्यात मा. शरद पवार साहेबांचे योगदान मोलाचे आहे. त्यांनी केंद्रीय कृषीमंत्री म्हणून सलग दहा वर्षे काम करताना भारतीय शेती विकासासाठी रचनात्मक कार्य केले भारतामध्ये फळबाग लागवड, तांदूळ उत्पादन, साखर उत्पादन आणि अनेक कार्यामधून त्यांनी शेतकऱ्यांच्या आणि शेती विकासाच्या साठी मोलाचे कार्य केले आहे.मा. शरद पवाराच्या निर्णयांना व विचारांना देशातल्या शेतकऱ्यांनी प्रचंड मेहनत करून भरघोस पाठिंबा दिला. त्यामुळे देशात दुसरी हरितक्रांती होऊ शकली. या हरितक्रांतीचे मुख्य श्रेय शरद पवार यांनाच जाते.

**६ शेतकऱ्यांच्या आत्महत्या व कृषी कर्जमाफी**

सन 1991 नंतर भारताने खाउजा धोरणाचा अवलंब केल्यानंतर येथील अर्थव्यवस्थेमध्ये परिवर्तन झाले. मात्र त्याचा शेतीसारख्या क्षेत्रावर दूरगामी परीणाम झाला. खाउजा धोरणासाठी आपण उद्योग व सेवा क्षेत्रांमध्ये योग्य ते बदल घडविले मात्र आपण शेतीव्यवसायचे शेती उद्योगात रूपांतर करू शकलो नाही. याचा फटका शेतकऱ्यांनाबसला परिणामी शेतकऱ्यांनी आत्महत्या सारख्या मार्गाचा अवलंब केला. यावर उपाय म्हणून श्री. शरद पवार यांनी सर्वात मोठी म्हणजे तब्बल 71 हजार कोटी रुपयांची शेतकऱ्यांना कर्जमाफी जाहीर केली. त्याचबरोबर दुग्ध व्यवसायाला चालना दिली, शेतीसाठी पायाभूत सुविधा निर्माण केल्या, अल्पदरात पतपुरवठा केला, सहकारी चळवळीस पाठींबा दिला, शेतमालाला हमीभाव व हक्काची बाजारपेठ मिळवून दिली परिणामी शेतकऱ्याच्या आर्थिक परस्थितीत सुधारणा होण्यास प्रारंभ झाला.

**७ राष्ट्रीय कृषी विकास परिषद**

स्वातंर्त्यानंतर शेतीसाठी पहिल्यांदा राष्ट्रीय विकास परिषदेची बैठक मा. शरद पवार यांनी मंत्रीमंडळाला व पंतप्रधान मनमोहन सिंग यांना घ्यायला लावली. देशातल्या कृषी क्षेत्राला जी मरगळ आलेली होती ती दूर करण्यासाठी व कृषी विकासाचा दर वाढविण्यासाठी या परिषदेचा खूप उपयोग झाला. त्यातून शेतीची भांडवली गुंतवणूक वाढविणारी राष्ट्रीय कृषी विकास योजना जन्माला आली. या योजनेचा शेतकर्‍यांना फायदा झाला.

**८ कृषी संशोधन व विकासासाठी योगदान**

कृषी विकासासाठी श्री. शरद पवार यांनी मोठे योगदान दिले आहे. त्यामध्ये परदेशी विद्यार्थ्यांनी भारतात यावे व भारतीय विद्यार्थ्यांनी परदेशी विद्यापीठात जाऊन अध्ययन करावे, यासाठी त्यांनी आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या शिष्यवृत्तीची योजना सुरु केली. देशातल्या प्रत्येक विद्यापीठात त्यांनी परदेशी विधार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहे, शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र कृषी भवन, हस्तकला व हस्तकौशल्य विकासासाठी प्रशिक्षण केंद्रे, विशिष्ट क्षेत्रातील कौशल्य विकासासाठी वेगळी केंद्रे स्थापन करणे, कृषी विकास केंद्रे आणि प्रयोगशाळांचे आधुनिकीकरण इत्यादी गोष्टी सुरु केल्या

एकंदरीत मा. शरद पवारांच्या कृषी क्षेत्रातील विविधांगी कार्यामुळे विपन्न अवस्थेत असलेल्या भारतीय शेतकऱ्यांना नवा प्रकाश मिळाला. शेती करणे हे फार कठीण झाले आहे. हा वाक्यप्रयोग त्यांनी पुसून टाकला. शेतीमालाला उचित बाजारभाव दिले. शेतकऱ्यांची कर्जे माफ केली व शेतकऱ्यांना स्वस्तात पुरेशे कर्ज उपलब्ध करून दिले. फळबागा समृद्ध केल्या शेतीतून नवनवीन उत्पनाची साधने दिली. परिणामी भारतीय शेती व शेतकऱ्यांना नवा आत्मविश्वास मिळाला. शरदरावांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळे व प्रेरणेमुळेच महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात शेती व शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात विकास झाला.

**संदर्भ**

१. शरद पवार — दुसरी हरित क्रांती—अमेय प्रकाशन— पुणे, 2 ऑगस्ट 2014

२. सुभाष शिंदे—कार्यसम्राट डॉ. शरद पवार—12 डिसेंबर 2019

३. श्री. राम कांडगे — लोकनेते शरदराव पवार—राजश्री प्रकाशन, चाकण, पुणे नोव्हेंबर 2010

४. शरद पवार — काटेवाडी ते मंत्रालय (आत्मकथन) अविष्कार पुणे,फेब्रुवारी 2017

५. डॉ. विमला केशवराव पाटील —शरद पवाररू कार्यकर्तुत्वचा अखंड प्रवाह—सातारा, एप्रिल 2015

६. सोपान गाडे— धुरंधर नेता—अविष्कार प्रकाशनपुणे, 12 डिसेंबर 2013

७. पद्मभूषण देशपांडे— पर्व प्रगतीचे परिवर्तनाचे—यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई 11 ऑक्टोबर 2016

८. दैनिक सकाळ दृ दिनांक १२ डिसेंबर २००४

९. दैनिक लोकसत्ता दृ १२ डिसेंबर २०१७